महाराष्ट्र शासन

अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, गडचिरोली.

बांधकाम भवन, कॉम्पलेक्स परिसर, गडचिरोली - ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२२४१६.

**email address :** gadchiroli.se@mahapwd.gov.in

# नागरीकांची सनद

## सन २०२१-२२ करिता

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ४ ची माहिती कलम ४, सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने.**

**कलम (ख) ची माहिती :-**

**१. प्रस्तावना ........**

**१. प्रस्तावना,**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागास सुमारे १५० वर्षाची गौरवशाली परंपरा आहे. चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्याकरीता सा. बां. विभागाचे प्रशासकीय कार्यालय यापुर्वी चंद्रपुर येथे होते. या दोन्ही जिल्ह्याकरीता रस्ते विकासाचे फार मोठे लक्ष पुढे ठेवुन तसेच आदिवाची जिल्ह्याचा जलद गतीने विकास होण्याचे दृष्टीने दिनांक ०१/०२/२०१० रोजी सार्वजनिक बांधकाम मंडळ, गडचिरोली मुख्यालयी उघ्सडण्यात आले. त्यामुळे या जिल्ह्यातील रस्ते विकासाचे भव्य प्रवेशद्वार खुले करणारे असे महत्वाचे कार्यालय दिनांक ०१/०२/२०२० पासुन गडचिरोली येथे कार्यरत आहे. सा. बां. मंडळ गडचिरोली हे कार्यालय गडचिरोली जिल्ह्यातील नागरीकांशी बांधिलकी जपण्यास कटीबद्ध असल्याचे या नागरीकांची सनदेद्वारे जाहीर करीत असून ती स्विकारत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या सेवा नागरीकांना सन्मानपुर्वक व सौजन्याने उपलब्ध व्हाव्यात व नागरीकांचे सामाजिक प्रश्न सहानुभुतीपुर्वक सुटावेत हा दृष्टीकोन तसेच सर्वसामान्य नागरीकांचे सार्वजनिक बांधकाम विभाग विषयक हक्क त्यांच्यापर्यंत प्रगतीच्या वाटेने अत्यंत सुलभतेने पोहचविण्याचा हा ध्यास आहे.

१)शासकीय इमारतींची (कार्यालयीन व निवासी गाळे) नवीन बांधकामे उत्तम गुणवत्तेची, टिकाऊ, सुरक्षित, अत्यावश्यक सुविधायुक्त, सौदर्यपूर्ण व सभोवतालचा परिसर सुशोभित करण्याचा प्रयत्न करणे.

२) रस्ते विकास योजनेतील रस्त्यांची नविन बांधकामे, सुधारणा, तसेच त्यावरील मोठे पूल, लहान पूल, मोऱ्यांची बांधकामे उत्तम दर्जाची व सुरक्षित करणे.

३)इमारती, रस्ते व पूलाची नियतकालीन देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

४)या मंडळाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय विभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामगाजात सुसुत्रता ठेवणे.

५)सार्वजनिक ठिकाणी जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसे अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी वापरावयाचे मंडळ, स्टेज, इत्यादी बाबतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करुन प्रमाणित करणे.

६)आपातकालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियंत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

७)सर्व कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

८)ठेकेदारांची नोंदणी प्रमाणपत्रे व विविध ना-हरकतीचे दाखले विहीत कालावधीत निर्गमित करणे.

९)सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या फलकावर जाहीररित्या प्रदर्शित करणे.

१०)प्रत्येक कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनेतची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

११)**"माहितीचा अधिकारी अधिनियम"** अंतर्गत मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.

१२)विभागाच्या कामगाजात सातत्य ठेऊन व आधुनिकता आणून विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१३)नागरीकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

१४)संगणकीकरणाबाबत सर्व विभागीय कार्यालये, मंडळ कार्यालये, प्रादेशिक कार्यालये तसेच मंत्रालय यांना नेटवर्कने जोडून आवश्यक माहिती उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.विभागाची विविध माहिती 'www.mahapwd.com' या संकेतस्थळावर अद्यावत उपलब्ध करणे.

१५)विभागांतर्गत येणा-या सर्व विषयांची अनुसुची तयार करणे व निपटारा करण्याच्या विहीत कालावधी ठरविणे.

१६)विभागाच्या कामकाजात पारदर्शकता व सुसुत्रता आणणे व गतीशिल प्रशासकीय कामकाजाचा अवलंब करणे.

१७)विभागांतर्गत सर्व कार्यालयामध्ये अतिशय सौजन्यपूर्ण, सेवाभावी, उत्साहीत वातावरण ठेवणे.

१८)दैनंदिन कामकाजात आधुनिकता, गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रतिमा उज्वल करणे.

अधिक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ
गडचिरोली

**आपली रचना, कार्य व कर्तव्य यांचा तपशिल**

१) सार्वजनिक बांधकाम विभागात शासनाचे विभागापैकी मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या अधिपत्याखाली सा. बां. मंडळ, गडचिरोली हा एक असून, या मंडळांतर्गत राज्यक्षेत्रातील रस्ते व शासकीय इमारतींची बांधकामे व देखभाल / दुरुस्तीची कामे केली जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत कामे वेळीच पूर्ण होण्याचे दृष्टीने विशिष्ट रचना करण्यांत आली आहे. या मंडळ कार्यालयावर मा. मुख्य अभियंता सा.बां. प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे नियंत्रण असते व शासन स्तरावर हे नियंत्रण मा.मंत्री, सा. बां. विभाग यांच्यातर्फे केले जाते.या कामी त्यांना मा.सचिव, रस्ते /बांधकामे हे मदत करतात.

२) या मंडळांतर्गत इमारती व रस्त्यांची बांधकाम व त्यांच्या देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात.

३) सा. बां. प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या अधिपत्याखाली सार्वजनिक बांधकाम मंडळ,गडचिरोली आहे. सार्वजनिक बांधकाम मंडळ गडचिरोली अंतर्गत सा. बां. विभाग क्र.१ गडचिरोली, सा. बां. विभाग क्र. २ गडचिरोली, सा. बां. विभाग आलापल्ली आणि विशेष प्रकल्प विभाग सिरोंचा कार्यरत आहेत. त्याशिवाय शासकीय इमारतीची विद्युत कामे करण्यासाठी मुख्यालयाच्या ठिकाणी १ विद्युत उपविभाग आहे. तसेच शासकीय यांत्रिकी वाहनांची दुरुस्ती करण्यासाठी गडचिरोली येथे १ यांत्रिकी उपविभाग आहेत. कार्यालय आहे. या मंडळाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून केलेली कामे योग्य गुणवत्तेनुसार केली आहेत काय? तसेच काम करतांना शासनाने निश्चित केलेल्या विनिर्देशानुसार नियमानुसार करणेत आली आहेत काय ? हे तपासले जाते. या मंडळाकडून क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचे तांत्रिक परिरक्षण करण्यांत येते. तसेच काही कामांची अचानक तपासणी करण्यात येते. सा. बां. विभागाच्या अधिपत्याखाली या मंडळाकडून क्षेत्रिय मंडळाकडून प्रशिक्षण देण्यात येते. तसेच प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर अधीक्षक अभियंता व नियंत्रक मंडळाकडून चौकशी केली जाते.

**वरील सर्व कार्यालये प्रशासन व तांत्रिक कामांची अंमलबजावणी सा. बां. मंडळ,गडचिरोलीच्या नियंत्रणाखाली करण्यांत येते.**

४) अधीक्षक अभियंता यांना कार्यकारी अभियंता हे सहाय्य करतात व कार्यकारी अभियंता हे विभागाचे प्रभारी असतात. ते विभागांतर्गत प्रशासन व बांधकामे पाहतात.

५) प्रत्येक अधीक्षक अभियंत्यांच्या अधिपत्याखाली कार्यकारी अभियंते असतात, हे कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालयाचे प्रभारी असतात. त्यातील प्रत्येकाकडे जिल्हयाचे क्षेत्र अथवा तालुक्याचे कार्यक्षेत्र असते. प्रत्येक तालुक्याला एक उपविभागीय अभियंताची नेमणूक केली जाते. उपविभागीय अभियंता हे उपविभागाचे प्रभारी असतात. उपविभाग हे सर्वात शेवटचे (निम्नस्तर) कार्यालय आहे. विभागीय व उपविभागीय कार्यालय स्तरावर कामासंबंधी सर्व प्राथमिक माहिती उपलब्ध होऊ शकते. राज्यक्षेत्राकरीता कार्यकारी अभियंता हे सा. बां.विभागाच्या नियंत्रणासाठी काम करतात. स्थानिक क्षेत्राकरीता (जिल्हा परिषद) कार्यकारी अभियंत्यांची नेमणूक केली जाते. राज्यक्षेत्रामार्फत राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्गावरील कामे केली जातात. तर स्थानिक क्षेत्र हे इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गांची कामे पहाते. जिल्हा परिषदेकडे नेमलेले कार्यकारी अभियंता हे ग्रामिण विकास विभाग यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आस्थापनेकडे असल्याने त्यांचा सव सेवाविषयक तपशिल तसेच वेतन, भत्ते, नियुक्ती इ.आस्थापना विषयक बाबी या मंडळाच्या अखत्यारीत येतात.कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग हा खऱ्या अर्थाने माहितीचा स्त्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरुवातीपासून संबंधीत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात मिळू शकते. त्याचप्रमाणे हया मंडळांतर्गत येणारी विशिष्ट कामे उदा. यांत्रिकी, विद्युतीकरण,संकल्पचित्र वास्तुशास्त्रीय नकाशे / आराखडे तयार करणे, बगीच्यांचे निर्माण व देखभाल करणे इत्यादी कामे यांत्रिकी अभियंते , विद्युत अभियंते, संकल्पचित्र मंडळ, वास्तुशास्त्रज्ञ कार्यालय, उपवने व उद्याने शाखा यांच्यामार्फत करण्यांत येतात. प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा. बां. नियमावली, लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिकाऱ्यांडकून केले जाते.

१) **सार्वजनिक बांधकाम मंडळ गडचिरोली चे कार्यक्षेत्र :- हया मंडळ कार्यालयाचे**

कार्यक्षेत्र गडचिरोली जिल्हा असून एकूण **१२** तालुक्यात विखुरलेले आहे. हया विभागातर्गत कार्यरत गडचिरोली जिल्हयातील तालुका निहाय खालीलप्रमाणे भौगोलिक क्षेत्र आहे.

**तालुका निहाय भौगोलिक क्षेत्र आहे.**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | क्षेत्रफळ चौ.कि.मी. |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा गडचिरोली | तालुका- गडचिरोली | ७२१ चौ.कि.मी. |
| २ | जिल्हा गडचिरोली | तालुका- आरमोरी | ११८९ चौ.कि.मी. |
| ३ | जिल्हा गडचिरोली | तालुका- देसाईगंज/वडसा | १८० चौ.कि.मी. |
| ४ | जिल्हा गडचिरोली | तालुका- कुरखेडा | १३९४ चौ.कि.मी. |
| ५ | जिल्हा गडचिरोली | तालुका- कोरची | ५२१ चौ.कि.मी. |
| ६ | जिल्हा गडचिरोली | तालुका- धानोरा | १८२१ चौ.कि.मी. |
| ७ | जिल्हा गडचिरोली | तालुका- चामोर्शी | ९५३ चौ.कि.मी. |
| ८ | जिल्हा गडचिरोली | तालुका- मुलचेरा | १५३ चौ.कि.मी. |
| ९ | जिल्हा गडचिरोली | तालुका- अहेरी | २५३३ चौ.कि.मी. |
| १० | जिल्हा गडचिरोली | तालुका- एटापल्ली | ३७१२ चौ.कि.मी. |
| ११ | जिल्हा गडचिरोली | तालुका- भामरागड | ४२२ चौ.कि.मी. |
| १२ | जिल्हा गडचिरोली | तालुका- सिरोंचा | ८१३ चौ.कि.मी. |

**हया विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत इमारतींचे जोते क्षेत्रफळ खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभागाचे नांव | इमारतींचे जोते क्षेत्रफळ चौ.मी. | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | निवासी इमारती | अनिवासी इमारती |
| १ | सा. बां. विभाग क्र.१,गडचिरोली | १९९९००.३३६ चौ. मी. | ९५४७१.६७६ चौ. मी. | १०४४२८.६६० चौ. मी. |
| २ | सा. बां. विभाग क्र.२,गडचिरोली | ७९७१६.५२१ चौ. मी. | २१८९९.१७१ चौ. मी. | ५७८१७.३५० चौ. मी. |
| ३ | सा. बां. विभाग आलापल्ली | ७२६३५.५३६ चौ. मी. | ३३१४७.३२२ चौ. मी. | ३९४८८.२१४ चौ. मी. |
| ४ | विशेष प्रकल्प विभाग, सिरोंचा | २४६३८.८५२ चौ. मी. | १३३३४.०४२ चौ. मी. | ११३०४.८१० चौ. मी. |

**१) या मंडळ अंतर्गत विभागाकडील कार्यभार दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | विभागाचे नांव | कार्यक्षेत्र (तालुका निहाय) |
|---|---|---|
| १) | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ गडचिरोली | गडचिरोली/आरमोरी/वडसा/कुरखेडा/कोरची |
| २) | सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ गडचिरोली | चामोर्शी/धानोरा/अंशतः गडचिरोली |
| ३) | सार्वजनिक बांधकाम विभाग आलापल्ली | अहेरी/आलापल्ली/एटापल्ली/भामरागड |
| ४) | विशेष प्रकल्प विभाग सिरोंचा | सिरोंचा |

२) **या मंडळ कार्यालयाचे बांधिलकी व नागरीकांची जबाबदारी विभागीय कार्यालयाची बांधिलकी**

वरील सर्व कर्तव्य पार पाडतांना सा. बां. मंडळ, गडचिरोली या नागरीकांच्या सनदेची अमंलबजावणी दिनांक ०१/०२/२०१० पासुन करण्यास मंडळ कटिबद्ध आहे. सनदेस व्यापक प्रसिद्धी देऊन, नागरीकांच्या प्रतिक्रिया/ अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील. सा. बां. मंडळ खात्रीपुर्वक गुणवत्तेची हमी देत आहे. विभागाच्या कुठल्याही माहीतीसाठी नागरीकांना संवेदनशिल, सौजन्यपुर्ण मदत करण्याच्या भावनेने वर्तणुक मिळेल. कार्यपद्धती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबद्ध निराकरण करण्यात येईल.

**परिशिष्ट - अ**

**वृक्षतक्ता**

**सार्वजनिक बांधकाम मंडळ, गडचिरोली.**
श्रीमती, निता ठाकरे- अधिक्षक अभियंता
श्री. एस. जी. मुंदडा, सहा. अधिक्षक अभियंता **(अतिरीक्त कार्यभार)**
दिनांक: १३ जानेवारी, २०२२

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. एस. एस. साखरवाडे<br>कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,<br>गडचिरोली | श्री. एस. डी. उसेंडी<br>कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२,<br>गडचिरोली | श्री. ए. वाय. मेश्राम<br>कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>आलापल्ली | श्री. ए. वाय. मेश्राम<br>कार्यकारी अभियंता<br>**(अतिरीक्त कार्यभार)**<br>विशेष प्रकल्प विभाग, सिरोंचा |
| श्री.प्रशांत कुमार,<br>विभागीय लेखापाल | श्री.राजीव रंजन,<br>विभागीय लेखापाल | श्री.सुमीत कुमार,<br>विभागीय लेखापाल | श्री.सुमीत कुमार,<br>विभागीय लेखापाल<br>**(अतिरीक्त कार्यभार)** |
| श्री. पि.एम.ढोंगे<br>उपकार्यकारी अभियंता<br>**(अतिरीक्त कार्यभार)**<br>सा.बां.विभाग क्र.१, गडचिरोली | श्री. व्ही. के.तभाणे<br>उपकार्यकारी अभियंता<br>**(अतिरीक्त कार्यभार)**<br>सा.बां.विभाग क्र.२, गडचिरोली | श्री. डी.एल.रामटेके<br>उपकार्यकारी अभियंता<br>**(अतिरीक्त कार्यभार)**<br>सा.बां.विभाग, आलापल्ली | श्री. ए.आर.रेळेकर<br>उपकार्यकारी अभियंता<br>**(अतिरीक्त कार्यभार)**<br>वि.प्र.विभाग, सिरोंचा |
| श्री. आर. पी. टेंभुर्णे<br>उपविभागीय अभियंता<br>**(अतिरीक्त कार्यभार)**<br>सा.बां.उपविभाग क्र.१, गडचिरोली | श्री. डी. एस. बड्डे<br>सहा. अभियंता श्रेणी-१<br>**(अतिरीक्त कार्यभार)**<br>सा.बां.उपविभाग क्र.४, गडचिरोली | श्री. डी. एस. ठाकुर<br>उपविभागीय अभियंता<br>सा.बां.उपविभाग, आलापल्ली | श्री. ई.एल.टिकले<br>सहा. अभियंता श्रेणी-१<br>सा.बां.उपविभाग, सिरोंचा |
| श्री. एस.जी. मुंदडा<br>सहा. अभियंता श्रेणी-१<br>सा.बां.उपविभाग क्र.२, गडचिरोली | श्री. डी. एस. बड्डे<br>सहा. अभियंता श्रेणी-१<br>सा.बां.उपविभाग, चामोर्शी | श्री. एस.एन.बावणे<br>उपविभागीय अभियंता<br>सा.बां.उपविभाग, एटापल्ली | श्री. डी.जी.सोनटक्के<br>उपविभागीय अभियंता<br>वि.प्र.उपविभाग क्र.१, सिरोंचा |
| श्री. एम.एच.मेश्राम<br>उपविभागीय अधिकारी<br>सा.बां.उपविभाग, आरमोरी | श्री. आर.एस.चट्टा<br>उपविभागीय अभियंता<br>सा.बां.उपविभाग, धानोरा (द) | श्री. आर.के.पारेलवार<br>उपविभागीय अभियंता<br>सा.बां.उपविभाग, अहेरी | |
| श्री. एस.डी.गवळी<br>उपविभागीय अधिकारी<br>सा.बां.उपविभाग, वडसा | श्री.ए.एन. वाघधरे,<br>उप- अभियंता **(अतिरीक्त कार्यभार)**<br>सा.बां. (यांत्रीकी) उपविभाग, गडचिरोली | | |
| श्री. ए.आर.मोरे<br>सहा. अभियंता श्रेणी-१<br>सा.बां.उपविभाग, कुरखेडा | | | |
| श्री. पि.एम.ढोंगे<br>उपविभागीय अधिकारी<br>सा.बां.विभाग, कोरची | | | |

**परिशिष्ट - ब**

**कार्यपुर्तीचे वेळापत्रक**

**अ.क्र. कार्यसुची करणारा सक्षम अधिकारी**

**कार्यपुर्तीचा कालावधी/मर्यादा**

**परिशिष्ट - ब**

**माहितीचा अधिकारी अधिनियम २००५**

**स्वतःची कार्य पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके**

-----------------------------------------------------------------

| अ. क्र. | कार्यसुची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १) | कंत्राटदार वर्ग १ अ, १ ब , १ क , २ व ३ यांची नोंदणी व नुतनीकरण | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई | ७५ दिवस |
| २) | कंत्राटदार वर्ग ४ व ४ (अ) नोंदणी व नुतनीकरण | मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग कार्यालय | ६० दिवस |
| ३) | कंत्राटदार वर्ग ५ व ६ आणि बेरोजगार अभियंतांचे नोंदणीकरण व मजूर सहकारी संस्था वर्ग-अ यांचे वर्गीकरणे व नुतनीकरण | अधीक्षक अभियंता | ३० दिवस |
| ४) | कंत्राटदार वर्ग ७, ८, ९ आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग-ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची परिक्षा उत्तीर्ण झालेलया उमेदवारांचे वर्ग-७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ५) | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा ना-हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ६) | पेट्रोल पंप व पेट्रोल पंपाच्या पोच मार्गाचे ना-हरकत प्रमाणपत्र | शासन | ६० दिवस |
| ७) | रस्ता ओलांडून जाणाऱ्या वाहिन्यांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र | मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, अधीक्षक अभियंता - इतर मार्गांसाठी | ३० दिवस |
| ८) | विश्रामगृहाचे आरक्षणपत्र उपलब्धता | कार्यकारी अभियंता | ७ दिवस ऑनलाईन सुविधा उपलब्ध |
| ९) | सरकारी इमारतीचे ना उपलब्धता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १०) | चलत चित्रपटगृहाचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ११) | सरकारी निवासस्थान न मिळणेचे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| १२) | रस्ते भाडे / प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १३) | इमारतीच्या भाडयाचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १४) | इमारतीचे मुल्य निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| १३) | इमारतीच्या भाडयाचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |

**मॅन्युअल ४(१) ब (९) व (१०)**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५**

**९) आपल्या अधिकाऱ्यांची आधि कर्मचा-यांची निर्देशिक +**

**१०) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नांव | पद नांव | मुळ वेतन | महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | अति. घरभाडे भत्ता | वाहन भत्ता | स्थानिक पुरक भत्ता | धुलाई भत्ता | डी.सी.पी. एस. | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १) | श्रीम. निता दि. ठाकरे | अधिक्षक अभियंता | ९६९०० | २७१३२ | ० | ० | ० | १५०० | ० | १७३६४ | १४२८८६ |
| २) | रिक्त पद | सहा.अधिक्षक अभियंता | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३) | श्री. ए.डी. मैत्र | अधिक्षक | ६७१०० | १८७८८ | ६०३९ | ४६० | ६०० | १२६५ | ० | ० | ९४२५२ |
| ४) | श्री. एम. सी. नारनवरे | प्रथम लिपीक | ६२१०० | १७३८८ | ० | ० | ४०० | १२६५ | ० | ० | ८११५३ |
| ५) | श्री. के. एन. भोयर | प्रमुख आरेखक | ८०१०० | २२४२८ | ७२०९ | ४६० | ६०० | १५०० | ० | ० | ११२२९७ |
| ६) | कु. एस. एस. बोरवटकर | कनिष्ठ अभियंता | ४४४०० | १२४३२ | ३९९६ | ४६० | ४०० | ६०० | ० | ७९५७ | ७०४४५ |
| ७) | श्री. आर.एस. बारापात्रे | वरीष्ठ लिपीक | ५६८०० | १५९०४ | ५११२ | ४६० | ४०० | १०६५ | ० | ० | ७९७४१ |
| ८) | श्री. बी. के. सिडाम | वरीष्ठ लिपीक | ५३६०० | १५००८ | ४८२४ | ४६० | ४०० | १०६५ | ० | ९६०६ | ८४९६३ |
| ९) | कु. के. एस. धात्रक | वरीष्ठ लिपीक | ५२००० | १४५६० | ४६८० | ४६० | ४०० | १०६५ | ० | ९३१९ | ८२४८४ |
| १०) | श्री. जी. बी. नैताम | कनिष्ठ लिपीक | ३६४०० | १०१९२ | ३२७६ | २६० | ४०० | ७०५ | ० | ६५२३ | ५७७५६ |
| १०) | कु. व्ही. टी. साव | कनिष्ठ लिपीक | ३२३०० | ९०४४ | २९०७ | २६० | ४०० | ६९० | ० | ५७८९ | ५१३९० |
| ११) | कु. एस.के. भांडारकर | कनिष्ठ लिपीक | ३२३०० | ९०४४ | २९०७ | २६० | ४०० | ८४४ | ० | ५७८९ | ५१५४४ |
| १२) | श्री. एस.यु. तागडे | कनिष्ठ लिपीक | २५५०० | ७१४० | ० | ० | ४०० | ७०५ | ० | ६५३८ | ४०२८३ |
| १३) | श्री. पी. डी. सहारे | शिपाई | ३५००० | ९८०० | ३१५० | १३० | ४०० | ५७६ | ५० | ० | ४९१०६ |
| १४) | श्रीमती, एस. एस. बिश्वास | शिपाई | ३२४०० | ९०७२ | ० | ० | ४०० | ५७६ | ५० | ० | ४२४९८ |
| १५) | श्री. टि. बी. शेख | शिपाई | १७१०० | ४७८८ | १८०० | १३० | ४०० | ४७६ | ५० | ३०६५ | २७८०९ |
| १६) | श्री. पी. आर. गरपट्टी | शिपाई | १५००० | ४२०० | १८०० | १३० | ४०० | ४७६ | ५० | २६८८ | २४७४४ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७) | श्री. एन. डी. रेड्डीवार | चौकीदार | १५००० | ४२०० | १८०० | १३० | ४०० | ४७६ | ५० | २६८८ | २४७४४ |

**अधीक्षक अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ**
**गडचिरोली**